# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२९५१६२६४ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि१२/१२/२०२५

## जिल्हा : सोलापूर

**हवामान अंदाज :**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१२/१२/२०२५ ते १६/१२/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| पाऊस (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कमाल तापमान (अं.से.) | 32 | 32 | 32 | 33 | 33 |
| किमान तापमान (अं.से.) | 12 | 13 | 13 | 14 | 14 |
| ढग स्थिती (आकाश) | 0 | 2 | 1 | 2 | 3 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 50 | 50 | 53 | 55 | 58 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 24 | 27 | 29 | 30 | 31 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 9 | 10 | 12 | 10 | 11 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 95 | 103 | 97 | 360 | 98 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १२ ते १६ डिसेंबर, २०२५ दरम्यान हवामान कोरडे व थंड राहण्याची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी शीत लहर येण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक १७ ते २३ डिसेंबर, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • किमान तापमान कमी राहण्याची शक्यता असल्याने बागेस/ पिकास रात्रीच्या वेळी पाणी पुरवठा करावा.<br>• जास्त थंड हवामानात पिकास खत देऊ नये कारण मुळांच्या खराब क्रियाशिलतेमुळे ते कार्यक्षमतेने घेऊ शकत नाहीत.<br>• पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• कीटकनाशक आणि तणनाशकाची फवारणी करताना वेगवेगळी करावी.<br>• कोणत्याही पिकावर कोणतेही कीटकनाशक , बुरशीनाशक किंवा तणनाशक फवारताना , त्या पिकाकरिता त्या रासायनिक औषधाचा लेबल क्लेम असल्याची खात्री करूनच वापर करावा.<br>• भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाचा पूर्वानुमाना करिता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा.<br>• सूक्ष्म पोषक पावडर फुले ग्रेड I याचा जमिनीतून वापर पेरणीच्या वेळी करा वा. फुले ग्रेड II हे द्रव सूक्ष्म पोषक मिश्रण आहे जे विशेषतः पानांवर वापरण्यासाठी १% तीव्रतेची शिफारस केलेले आहे. त्यासाठी |

| | | |
|---|---|---|
| | | पहिली फवारणी पेरणीनंतर सुमारे ३०-४५ दिवसांनी करावी. दुसरी फवारणी हि पहिल्या फवारणीनंतर १५-२० दिवसांनी पुन्हा करावी. ग्रेड I चा मातीत वापर आणि ग्रेड II चा पानांवरील फवारण्या एकत्रित केल्याने पिकाच्या वाढीच्या काळात सूक्ष्म पोषक घटकांची त्वरित आणि शाश्वत उपलब्धता सुनिश्चित होते , ज्यामुळे पिकाची चांगली वाढ , उत्पादन आणि गुणवत्ता मिळते. रब्बी पिके जसे ज्वारी, हरभरा, गहू इ. पिकांच्या पेरणीच्या वेळेस वापरावे. |
| गहू | मुकुट मुळे फुटणे ते फुटवे येण्याची अवस्था | गरजेनुसार व जमिनीच्या मगदुराप्रमाणे गहू पिकास पेरणीनंतर १८ ते २१ दिवसांनी मुकुट मुळांच्या अवस्थेत सुरवातीच्या वेळी पाणी द्यावे. सध्याच्या हवामानामुळे मावा किडीच्या नियंत्रणासाठी मेटारायझियम ॲनिसोप्ली ५० ग्रॅम किंवा बिव्हेरिया बॅसियाना ५० ग्रॅम किंवा व्हरटीसिलीयम लेकॅनी ५० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. मावा किडीचे रासायनिक पद्धतीने नियंत्रण करण्यासाठी थायामेथो झाम २५ टक्के विद्राव्य दाणेदार १ ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून गरजेप्रमाणे १५ दिवसांचे अंतराने एक किंवा दोन फवारण्या कराव्यात. |
| रब्बी ज्वारी | पीक वाढीची अवस्था | ज्वारी उगवण झाल्यानंतर तीन आणि पाच आठवड्या नंतर मातीतील पाणी संवर्धनासाठी कोळप णी करावी. ज्वारी वरील खोडमाशीच्या नियंत्रणाकरिता प्रोफिनोफोस ४० टक्के + सायपरमिथ्रीन ०४ टक्के ई.सी ची ०२ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. उभ्या पिकांमध्ये अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% ची फवारणी करावी. |
| कापूस | वेचणी / साठवणूक अवस्था | शेतातील अंदाजे ३० ते ३५ टक्के बोंडे फुटल्यावर पहिली वेचणी करावी त्यानंतर १५ ते २० दिवसाच्या अंतराने २ ते ३ वेचण्या कराव्यात. वेचल्यानंतर कापूस ३ ते ४ दिवस उन्हात वाळवून स्वच्छ व कोरड्या जागेत साठवावा. |
| मका | दाणे भरण्याची अवस्था | उभ्या पिकांमध्ये अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. |
| तूर | शेंगा भरण्याची अवस्था | शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये पिकास आवश्यकतेप्रमाणे व उपलब्धतेनुसार पाणी द्यावे. तुरीमध्ये शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये शेंगा पोखरणारी अळी (घाटेअळी) , मरूका, पिसारी पतंग व शेंग माशी या किडींचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे या किडींच्या नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा वापर करावा. शेताच्या बांधावरील तुरीच्या शेंगा पोखरणाऱ्या अळयांची पर्यायी खाद्यतणे उदा. कोळशी , रानभेंडी, पेटारी ही तणे वेळोवेळी काढून नष्ट करावीत. शेंगा पोखरणाऱ्या अळींचा प्रादुर्भाव कळण्यासाठी व किडींच्या नियंत्रणासाठी पाच कामगंध सापळे/हेक्टरी लावावेत. शेतात पक्ष्यांना बसण्यासाठी मचाण म्हणजेच इंग्रजी टी आकाराचे पक्षी थांबे ५०-६० प्रती हेक्टर उभारावेत. पिकास फुलकळी येतांना प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा निंबोळीयुक्त किटकनाशक अॅझाडिरेक्टीन ०.०३टक्के (३०० पी.पी.एम.) ५ मि.ली. प्रती लिटर पाणी या प्रमाणात पहिली फवारणी करावी. तुरीला पन्नास टक्के फुलोरा आल्यानंतर एच.ए.एन.पी.व्ही.५०० एल.ई. (हेलिओकिल) १.० मि.ली. प्रती लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| करडई | पीक वाढीची अवस्था | किमान तापमानात घट झाल्याने करडई पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढते. कडेच्या ओळींवर मावा कीड आढळल्यास ॲसिफेट ७५ एसपी १६ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| हरभरा | फुलोरा अवस्था | फुले लागण अवस्थेत पिकास उपलब्धतेनुसार पाणी द्यावे. हरभरा पीक पाण्यास अतिशय संवेदनशील असल्याने गरजेपेक्षा जास्त पाणी दिल्यास पीक उभळते. पिकास दिलेली खते व्यवस्थित उपलब्ध होण्यासाठी व उत्पादनामध्ये मोठी वाढ होण्यासाठी तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा. पिकावर फुलकळी लागण्याच्या वेळेस किडीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. हरभरा पिकावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी पक्षी थांबे उभारावेत व हेक्टरी ५ या प्रमाणे कामगंध सापळे लावावेत. |
| कांदा (रांगडा) | पीक वाढीची अवस्था | फुलकिडेच्या नियंत्रणासाठी टोलफेनपायरॅड १५ ई.सी.२ मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन ११ ई.सी. ३ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% ई.सी. १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून आलटुन पालटून फवारण्या कराव्यात. अधून मधून ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी. करपा रो गाच्या नियंत्रणासाठी डायफेनकोनॅझोल २५% ई.सी.१० मि.ली. १० लिटर पाण्यात किंवा टेब्युकोनॅझोल २५.९ टक्के ई.सी. १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारण्या कराव्यात. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | किमान तापमान कमी राहण्याची शक्यता असल्याने बागेस रात्रीच्या वेळी पाणी पुरवठा करावा. भल्या पहाटे बागेत ओला पाला पाचोळा जाळून धूर करावा. केळीच्या झांडास पीक अवस्थेनुसार प्रति झाड २५० ते १००० ग्रॅम निंबोळी ढेप द्यावी. घडास ६ % सच्छिद्रतेचे पांढऱ्या प्लॉस्टिक बॅगचे आवरण करावे. सध्याच्या हवामानामुळे करपा (सिगाटोका) रोगाच्या नियंत्रणासाठी रोगग्रस्त पानाचा भाग / पाने काढून बागेबाहेर जाळावीत तसेच केळीची पिल्ले धारदार कोयत्याने नियमित काढावीत. तसेच मेटीरम ५५ टक्के + पायऱ्याक्लोस्ट्रोबिन ५ टक्के (६० टक्के डब्लु जी) ३० ग्रॅम १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने २ फवारण्या कराव्यात . केळीच्या चिलिंग इन्जुरी टाळण्यासाठी केळी बागेभोवती हिरवी शेडनेट लावावी. केळीच्या खोडाभोवती सेंद्रिय पदार्थाचे जसे ऊसाचे पाचट , सोयाबीनचा भूसा यांचे |

| | | |
|---|---|---|
| | | आच्छादन करावे. बागे स शक्यतो रात्री व पहाटेच्या वेळी पाणी द्यावे. केळी पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार शिफारशीत रासायनिक खताची मात्रा द्यावी. पालाष या अन्नद्रव्याची कमतरता पडू देवू नये. नत्रयुक्त खताची अतिरिक्त मात्रा टाळावी. |
| **द्राक्ष** | पीक वाढीची अवस्था | किमान तापमान कमी राहण्याची शक्यता असल्याने बागेत भल्या पहाटे ओला पाला पाचोळा जाळून धूर करावा. |
| **आंबा** | पीक वाढीची अवस्था | आंबा पिकास चांगला मोहोर येण्यासाठी पाण्याचा ताण (पाणी तोडून) द्यावा. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कीटकनाशक आणि बुरशीनाशकाची फवारणी करावी. नवीन पालवीवर तु डतुड्यांच्या नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रिन २.८% ई.सी. ९ मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. बागेतील रोगांच्या नियंत्रणासाठी ०.२५ टक्के कॉपर ऑक्झिक्लोराईड (२५ ग्रॅम १० लिटर पाण्यात) किंवा १ टक्का बोर्डो मिश्रण किंवा ०.१ टक्का कार्बेडेझीम (१० ग्रॅम १० लिटर पाण्यात) फवारावे. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | जनावरांना रात्री शेडमध्ये ठेवा आणि त्यांना थंडीपासून वाचवण्यासाठी कोरडे अंथरूण द्या. थंड हवामानाचा सामना करण्यासाठी व जनावरांना निरोगी ठेवण्यासाठी खाद्यामध्ये प्रथिने आणि खनिजांचे प्रमाण वाढवा. जनावरांची ऊर्जेची गरज भागवण्यासाठी हिवाळयात दैनंदिन रेशनमध्ये १० % - २० % मिठासह प्राण्यांना नियमितपणे खनिज मिश्रण आणि गव्हाचे धान्य , गूळ इत्यादी द्या. सकाळच्या वेळी गुरे/शेळया चरण्यास नेऊ नका. रात्रीच्या वेळी गुरे/शेळी उघड्यावर ठेवू नका. पोल्ट्री शेडमध्ये कृत्रिम प्रकाश देऊन पिलांना उबदार ठेवा. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :-
ठिकाण : कृ .म.वि., पुणे.
दि. : १२.१२.२०२५

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**